# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०४/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## आॅनलाईन फसवणूकीत पैसे थांबविण्यात नागपूर ग्रामीण सायबर पोलीस स्टेशनचे यश

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत तक्रारदार प्रवीण घोरले वय २९ वर्षे रा. एम.आय.डी.सी. कळमेश्वर यांना अनोळखी व्यक्तीने मोबाईल वरून ऑनलाईन जॉब करीता मॅसेज केला होता. तक्रारदार यांना चांगल्या जॉबची आवश्यकता असल्याने तक्रारदारला वॉट्सअॅपवर मॅसेज आला की, आम्ही तुम्हाला कमिशन बेसिसवर काम देवु शकतो. त्यासाठी टेलीग्राम अॅप डाऊनलोड करायला लावून त्यावर दिलेला टास्क पूर्ण करायला लावला. त्यासाठी अर्जदार यांनी वेगवेगळया बॅक खात्यात अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवून रक्कम गुंतवत गेला असे करत १५,२१,०००/— गुंतवणुक केल्यावर तक्रारदारचे लक्षात आले की, आपल्या सोबत फसवणुक होत आहे. या नंतर तक्रारदाराने NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार केली.

सदर तक्रार सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे प्राप्त होताच तपासाचे सुत्र हालवुन सदर तक्रारदारचे पैसे कोणकोणत्या खात्यावर ट्रान्सपर झाले याची माहिती तात्काळ घेण्यात आली. व सायबर फ्रॉड मधील आरोपी पैसे लवकर विड्रॉल करतात याची माहिती असल्यामुळे ज्या खात्यावर पैसे ट्रान्सपर झाले आहे ते सर्व अकांउट डेबिट फ्रिज केले. त्यामुळे तक्रारदारचे पैसे ज्या बॅक खात्यामध्ये गेले ते पैसे होल्ड झाले. त्यांनतर तक्रारदारला बोलवुन कोर्टा मध्ये सदर रक्कम परत घेण्याबाबत योग्य मार्गदर्शन करून मा. कोर्ट नागपूर येथे पेसै परत घेणे करीता सुपूर्दनामा दाखल केला. मा. कोर्टाने कार्यवाही पूर्ण करून तक्रारदारचे फसवणुक झालेली रक्कम परत करण्याचे आदेश पारित केले. यामुळे तक्रारदारने सायबर पोलीस स्टेशन व मा. न्यायलायाचे आभार मानले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक डॉ. रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस चंद्रशेखर चकाटो, पो.उपनि. भारत थिटे, पो.हवा स्नेहलाता ढवळे, वर्षा खंडाईत, मनापोअं संगीता गावंडे, ममता सरोदे, नापोअं सतीष राठोड, पोशि मृणाल राऊत, मनीष नेवारे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर